### कॉर्पोरेट क्षेत्रात वापर : तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास मदत; अधिक सुरक्षित असल्याचा दावा

# अंतिम परीक्षांसाठी वेब ‘प्रॉक्टर’चा पर्याय

**संतोष मिठारी।**
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम सत्राच्या परीक्षा ऑनलाईन घेण्याची सूचना राज्य शासनाने विद्यापीठांना केली आहे. त्यासाठीच्या संगणक प्रणालीचा सध्या विद्यापीठांकडून शोध सुरु आहे. त्यांच्यासाठी कॉर्पोरेट क्षेत्रात कर्मचारी भरतीसाठी वापरल्या जाणाऱ्या वेब प्रॉक्टर एक्झाम (परीक्षण परीक्षा) या संगणक प्रणालीचा पर्याय उपयुक्त ठरणारा आहे. इंटरनेट, वीजपुरवठ्याच्या उपलब्धतेबाबतची तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास या प्रणालीची मदत होऊ शकते.

## अशी काम करते ही प्रणाली

सर्व्हरवरुन पाठविलेल्या प्रश्नपत्रिकेच्या लिंकवर विद्यार्थ्यांनी मोबाईल, संगणक, लॅपटॉपवर ओटिपी (वनटाईम पासवर्ड) टाकून क्लिक केल्यापासून संबंधित प्रणाली कार्यान्वित होते. वीजपुरवठा अथवा इंटरनेट खंडित झाल्यानंतर किंवा अन्य कोणती तांत्रिक समस्या निर्माण झाल्यास त्याची नोंद होते. परीक्षेची वेळ संपल्यानंतर उत्तरपत्रिका आपोआप लॉक होते. प्रश्नपत्रिका कॉपी करता येत नाहीत. वेब प्रॉक्टरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवता येते.



प्रॉक्टर ही प्रणाली क्लाऊड बेस्ड असून ती सुरक्षित आहे. त्यामध्ये गैरप्रकार करता येत नाहीत. स्टॉक एक्स्चेंज, विप्रो, इन्फोसिस, आदी संस्थांमधील कर्मचारी भरतीसाठी या प्रणालीचा वापर केला जातो. सध्याच्या स्थितीत विद्यापीठांना या प्रणालीव्दारे ऑनलाईन परीक्षा घेण्याचा चांगला पर्याय आहे.

**- डॉ. आर. के. कामत,**
संगणकशास्त्र विभागप्रमुख

ओएमआर (वस्तुनिष्ठ बहुपर्यायी) पद्धतीने ५० गुणांची एक तासाची ऑनलाईन आणि ऑफलाईन या पर्यायाचा वापर करुन परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यापीठांनी घेतला आहे. विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार २२ दिवसांमध्ये परीक्षांचे कामकाज पूर्ण करावे लागणार आहे. विद्यापीठांकडे तयारीसाठी सध्या वेळ कमी आहे. शिवाजी विद्यापीठाच्याबाबतीत विचार केल्यास दुर्गम आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी अधिक आहेत. काही भागामध्ये इंटरनेट, वीजपुरवठ्याची खंडित होण्याची समस्या आहे. अशा स्थितीत त्याठिकाणी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेणे अडचणी ठरु शकते.

त्याठिकाणी वेब प्रॉक्टर प्रणालीचा वापर मदतीचा ठरु शकतो. या प्रणालीमध्ये पर्यवेक्षकाप्रमाणे काम करणारी यंत्रणा ही इनबिल्ट असते. प्रश्नपत्रिका ऑनलाईन पाठविण्यापासून ते परीक्षेचा कालावधी संपेपर्यंतच्या सर्व नोंदी या प्रणालीमध्ये होतात. ऑनलाईन परीक्षा घेण्यातील अधिक सुरक्षित पर्याय म्हणून या प्रणालीकडे पाहिले जाते, असे संगणकतज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे.